# रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने

## यांचें चरित्र.

बाळकृष्ण नारायण देव

यांनीं लिहिलें

तें

पुणें येथें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

१९०८

in marathi - 11|1•11°.

ग्रंथसमर्पण.

# कै. ती. मातुःश्री आनंदीबाई

ऊर्फ

# माई कीर्तने

ज्यांच्या सहवासांत प्रस्तुत चरित्रलेखकाच्या विद्यार्थिदशेंतला बराच भाग

वात्सल्य सुखाचा अमृतोपम अनुभव घेण्यांत गेला

व त्या काळीं त्याच्या

मातृहीन स्थितीचें स्मरण ज्यांनीं होऊं दिलें नाहीं.

आणि

हा ग्रंथ ज्यांच्या ह्यातींत प्रसिद्ध व्हावा अशी त्याची अत्युत्कट

इच्छा असतां तारीख १९ डिसेंबर १९०३ रोजीं

ज्यांचा प्लेगनें अंत झाला

त्यांच्या संस्मरणार्थ हा अर्पण केला आहे.

लेखक.

# प्रस्तावना.

प्रस्तुत चरित्रनायक हे अर्वाचीन राजकारणी पुरुषांत बरेच प्रमुख असून त्यांनीं बडोदें व इंदूर या दोन संस्थानांत मोठीं कामें केलीं होतीं. तेव्हां त्यांचें आयुर्वृत्त बरेंच बोधप्रद होईल असें समजून मीं हें चरित्र लिहिलें आहे. त्यांत यश कितपत आलें आहे हें पाहणें वाचकांकडे आहे.

मीं चरित्रविषयावर बरेंच वाचलेलें आहे व कांहीं थोडेंसें लिहिलेलें आहे; पण चरित्रनायकाच्या सहवासांत राहून त्याचें गुणवर्णन करण्याचा हा पहिलाच प्रसंग होय. यांत मीं चरित्रनायकाचे यथार्थ गुणदोष आपल्या बुद्धीप्रमाणें निःपक्षपातानें प्रगट केले आहेत. मीं त्यांच्याविषयीं भाविकभक्ति आणि विरोधभक्ति या दोन्ही मनोहर वृत्ति जाहिर केल्या नाहींत, किंवा आपल्या मताप्रमाणें मी त्यांस वश झालों नाहीं. मला जर हें चरित्र वाचकांस हितावह व अनुकरणीय होईल असें वाटलें नसतें, तर माझा चरित्रनायकाबद्दल कितीही आदर व पूज्यभाव असला तरी मीं त्यांचें चरित्र लिहिण्याचें काम कधीं पत्करलें नसतें. आतां तें लिहिण्यांत कदाचित् गैरसमजुतीनें कांहीं प्रकार अन्यथा झाला असेल; नसेल असें म्हणवत नाहीं. तर तथापि बाबतींत यथार्थ प्रकार उघड करणें त्यांचे अनेक विद्वान्

सहाध्यायी व स्नेही यांस शक्य आहे आणि तें ते करतील अशी आशा आहे.

अलीकडे रा० ब० कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, गोपाळराव हरी देशमुख, दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग, ना. काशीनाथ त्र्यंबक तेलंग; श्रीपाद बाबाजी ठाकूर इत्यादि थोर, राजकारणी, व विद्वान् सुधारक पुरुष गत झाले, परंतु त्यांचें चरित्र किंवा यथार्थ गुणवर्णन त्यांच्या कोणीही परिचित विद्वान् लेख्यांनीं करण्याचें मनावर घेतलें नाहीं. ही चरितलेखनाविषयींची विन्मुख वृत्ति आमच्या राष्ट्राचीच आहे असा पाश्चात्य विद्वानांचा आह्मावर यथार्थ आरोप आहे. त्याचें निराकरण पाश्चात्य शिक्षणप्रसार बराच झालेल्या अशा प्रस्तुतकाळीं विशेष झालें आहे असें नाहीं. यास अपवादरूप विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें एक चरित्र असून दुसरें ना० विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र एक विद्वान चरित्रकार लिहून विविधज्ञानविस्तार मासिकपुस्तकांत छापीत आहेत ते, अशीं दोनच मुख्यतः होत. तथापि वरील महाशयांचीं यथार्थगुणदर्शक चरित्रें त्यांच्या देशबांधवास अनेक प्रकारांनीं हितावह होणारीं आहेत. तीं त्यांच्या परिचयांतले मार्मिक विद्वान् प्रगट करण्याची कृपा करतील तर मराठी सारस्वताचें मोठें कल्याण होईल. या कामीं त्यांस सूचना देण्यासाठीं ह्मणून मीं अल्पमति असूनही हें काम हातीं घेतलें. चरित्रलेखन अनेक प्रकारांनीं मोठें नाजूक व बिकट काम आहे असं जॉनसननें ह्मटलें आहे. कारण चरित्रनायकच्या संबंधानें "अशेषसत्यप्रतिपादन" त्याच्या जीवनकालास निदान

चार पांच तपें लोटल्यावांचून निःपक्षपातानें करण्यास अनेक अडचणी असतात. बरें, इतका अवधि लोटूं दिला तर तें करण्याचीं साधनें म्हणजे त्यांबद्दलचें लोकमत, त्यांच्या परिचितांचा अनुभव, त्यांचें अंतर्गत गुणज्ञान इत्यादि गोष्टी कालवशानें मलिन, अस्पष्ट व अंधुक होतात. त्यामुळेंच डॉ० जॉनसननें आपल्या कविचरित्रांत अर्वाचीन व समकालीन चरित्रनायकांबद्दल जरी सत्यप्रकारच प्रगट केला आहे, तरी तें " अशेष व संपूर्ण सत्य " नाहीं असें स्पष्ट ह्मटलें आहे. कारण तो मार्ग ह्मणजे " विस्तव पूर्ण न विझलेल्या अशा फुपाट्यांतून चालण्यासारखा आहे " असें तो विद्वान चरित्रकार ह्मणतो. परंतु अशी स्थिति असली तरी आणि " अशेष व संपूर्ण सत्य " निवेदन करण्याची वेळ आली नाहीं तरी पाश्चात्य पंडितांचीं व राजकीय महापुरुषांचीं चरित्रें त्यांच्या हयातींत व मागें देखील प्रसिद्ध होत नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ ग्लॅडस्टन, फॉसेट वगैरेंचीं चरित्रें पहा. तेव्हां हा मार्ग केवळ अनुल्लंघनीयच नाहीं आणि या दिशेनें जाणें सर्वथैव अशक्यच आहे असें नाहीं. कोणीही मनुष्य सर्वगुणसंपन्न किंवा सर्वदोषविवर्जित असतो असें नाहीं. थोर पुरुष तर आपले दोषही प्रांजलपणें कबूल करतात. मग त्यांच्या दिग्दर्शनापासून अपाय तो कोणता ! आपल्या थोर चरित्रनायकांचे दोष प्रगट करावे, आणि त्यावर आक्षेप घेतल्यावर त्यांचें निरसनही सयुक्तिक कारण दाखवूनच करावें हा श्लाघ्य मार्ग दिसतो. तोच आदरून मींही यांत गुणदोषांचें यथामति दिग्दर्शन केलें आहे.

आमचे चरित्रनायक स्वतः फारसे स्तुतिप्रिय नव्हते, तेव्हां त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्यासही हा आपले विषयींचा गुणदोषविवेचनात्मक चरित्रलेख त्यांच्या एका आश्रित आप्तानें लिहिलेला पाहून आनंदच वाटेल अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. कारण, 'Paint me as I am' हें क्रॉमवेलचें मत त्यांस फार प्रिय होतें हें मला माहीत आहे.

यांत दिलेली बरीच माहिती कागदपत्रांवरून मिळविलेली आणि चरित्रनायकाच्या अनेक वर्षांच्या सहवासानें मला स्वतःला कळलेली होती व तिजवरूनच हें चरित्र मुख्यतः लिहिलें आहे. त्यांचे आप्त व स्वकीय यांजकडून या कामीं फारच थोडी मदत झाली. याचें कारण, चरित्रनायकाच्या गुणांविषयीं अनभिज्ञता नव्हे, तर आमच्या लोकांची अशा कामीं अनास्था हें होय. असो. मला मिळालेली माहिती मी निःपक्षपातबुद्धीनें आणि सत्यभक्तीनें आपल्या समजुतीप्रमाणें प्रगट केली आहे.

हें चरित्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें श्रेय चरित्रनायकाचे चिरंजीव रा. रा. दामोदर विनायक कीर्तने, ब्यारिस्टर–ॲट–लॉ, इंदूर संस्थानांतील सदर कोर्टाचे दुसरे न्यायाधीश, यांचेकडे आहे. त्याचप्रमाणें त्याचीं प्रुफें तपासण्याच्या कामीं माझे सन्मान्य मित्र प्रोफेसर राजाराम शास्त्री भागवत व रा. रा. वासुदेव गोविंद आपटे या उभयतांनीं मनःपूर्वक मदत दिली आणि वेळोवेळीं अनेक सूचना केल्या याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहे.

इंदूर, ता. १६ एप्रिल स. १९०४ इ. } बा. ना. देव.